**दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**

(दि विदर्भ **को– ऑप.बँक** लि., सम्मिलीत )

(शेडयुल्ड बँक)

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,

फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२

फोन नं. ९१-०२२–२२८००७४७/२२८७६०१५ ते २०, Website: https://mscbank.com.

# चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी देण्याबाबतची निविदा सुचना

दि. महाराष्ट्र स्टेट को–ऑप.बँक लिमिटेड मुंबई **"रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनानशिअल असेटस ॲन्ड एन्फोर्समेट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२"** नुसार कर्जदार कारखान्याच्या खालील नमुद मालमत्तेची विक्री करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

कर्जदार व मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे :–  (रु.लाखात)

| अ. क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत | बयाना रक्कम १० % | मालमत्ता पाहण्याची तारीख | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | दि.३१.१२.२० रोजी येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प.डॉ.वि.वि. पाटील ससाका.लि. अशोकनगर, ता.केज, जि.बीड | २५०० मे.ट. प्रती. दिन | कारखाना इमारत/ यंत्रसामुग्री व जमीन ६७.९८ हे. | ४५७८.८८ | ४५७.८९ | ०४.०३.२१ ते ०६.०३.२१ (११.०० ते ५.००) | १६.०३.२१ (दुपारी १२.००) | राज्य बँक ११७७९.१९ सहभाग ९२३४.४८ (३१.१२.१८) |

१. उपरोक्त मालमत्ता 'जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत' अशा अटीवर व ज्यास कोणतीही हमी, खात्री, बंधन, जबाबदारी वा प्रतिनिधीत्व शिवाय असलेल्या तत्वावर विकण्यात येईल. चल – अचल मालमत्तेचे क्षेत्रफळ, संख्या इ. बाबत कोणतीही हमी, खात्री, जबाबदारी इ. बाबत प्राधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. प्रा.फंड, शासकीय देणी, विज बिल, पाणी बिल, कामगार देणी, इ. वा अन्य वैधानिक देणी ( सद्याची व भविष्यात निर्माण होणारी) सर्वदेणी भागविण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

२. टेंडर उघडण्याच्या दिवशी प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च निविदा भरणा-या निविदाधारकास यशस्वी घोषित करतील. निविदा राखीव किंमतीपेक्षा जादा व विनाअट असणे आवश्यक आहे. निविदा रक्कम वाढविण्यासाठी बोली लावण्यात येणार नाही. यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नांवावर करुन घेण्यासाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ. करावा लागेल.

३. निविदा सोबत १० % बयाणा रु.४५७.८९ लाख रक्कमेचा भरणा आर. टी. जी. एस. द्वारे (RTGS/NEFT: IFSC:MSCI 0082002 A/c No.00021690000010 A/c Name DIRR Head office) दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई येथे जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदाधारकांना बयाणा रक्कम त्या दिवशी किंवा पुढील दिवशी परत करणेत येईल. बयाणा रक्कमेवर व्याज देण्यात येणार नाही.

४. विक्रीची/भाडयाची निविदा पुस्तिका (बीड डाक्युमेंट) बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई येथील डीआयआरआर विभागाचे व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे दि.१५.०२.२०२१ ते दि.१५.०३.२०२१ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (दुसरा व चौथा शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत मिळतील.

तसेच निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या वेबसाईटवरुनही (Website: https://mscbank.com.) डाऊनलोड करुन भरता येतील. मात्र निविदा बँकेत सादर करणेपूर्वी डाऊनलोड केलेल्या बीड डॉक्युमेंटपोटी फॉर्म फी रु.२९,५००/- (जी.एस.टी.सह) एन.ई.एफ.टी.द्वारे भरणे आवश्यक राहिल.

५. निविदा दाखल करावयाची अंतिम तारीख दि.१५.०३.२०२० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहिल. निविदा मुख्य कचेरी, मुंबई येथे दाखल कराव्यात.

६. मालमत्ता विक्री करणेचे अधिकार सरफेसी कायदा-२००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त आहेत. त्यानुसार योग्य ते कारण देऊन कोणतीही निविदा स्विकारण्याचा/रद्दबातल ठरविण्याचा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकारी यांना राहिल.

७. निविदा उघडण्याची तारीख दि.१६.०३.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता.

८. निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या https://mscbank.com वेबसाईटवर दि.१५.०२.२०२१ पासून दि.१५.०३.२०२१ पर्यंत उपलब्ध राहील.

९. उपरोक्त माहितीतील मुद्दे, अटी, शर्तीच्या स्पष्टतेसाठी बँकेने दि.१२.०२.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या लोकसत्ता व फायनान्सियल एक्स्प्रेसमधील इंग्रजी जाहिरातीतील माहितीचा आधार घ्यावा व ती अंतिम राहील.

## वैधानिक नोटीस

कर्जदारास सरफेसी कायदा २००२ अन्वये वैधानिक ३० दिवसाची विक्री नोटीस –

कर्जदार/जामिनदार यांना सुचित करण्यात येते की, राज्य सहकारी बँक व सहभागातील बँकांच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा उघडणेपूर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्तेची विक्री करुन कर्ज वसुली केली जाईल. तसेच विक्री प्राप्त रकमेतून संपूर्ण वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
( डॉ. अजित देशमुख )
व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई

दिनांक :- १२.०२.२०२१
ठिकाण :- मुंबई